# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडूंना" उडाण खेल प्रोत्साहन योजना "

**{क्रीडा व सांस्कृतिक विभाग}**

योजनेचा उद्देश :-

नागपूर महानगरपालिकेचा व आजूबाजूच्या परिसराचा झपाट्याने विकास होत असुन क्रीडा क्षेत्राचा विकास देखील तेवढ्याच झपाट्याने होणे गरजेचे आहे. नागपूर महानगरपालिका क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य राहावी. नागरीकांमध्ये व्यायामाची आवड जोपासावी. खेळाडूंची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करावी यासाठी या खेळाडूंना दर्जेदार सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिले आहे. काही खेळाडूंची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे किंवा विविध कारणामुळे खेळाडू बांधव क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट असले तरी त्यांना प्रशिक्षण घेणे, साहित्य खरेदी करणे, प्रशिक्षकांमार्फत मार्गदर्शन प्राप्त करणे, प्रवास करणे इत्यादी कार्याकरिता तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धामध्ये भाग घेण्यास अडचणी निर्माण होतात. खेळाडू बांधवांनी स्वतःचे, नागपूर शहराचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व संघटनेमार्फत खेळणा-या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून म.न.पा. क्षेत्रातील जास्तीत जास्त राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने रोख आर्थिक सहाय्य देण्याचा मानस आहे.

लाभ देण्यात येणाऱ्या स्पर्धा :-

| | | |
|---|---|---|
| १. ऑलम्पिक गेम्स | ६. राष्ट्रकुल युवा स्पर्धा | ११. शालेय आशियाई/जागतिक स्पर्धा |
| २. विश्व अजिंक्यपद स्पर्धा | ७. एशियन चॅम्पियनशिप | १२. पॅरा ऑलम्पिक स्पर्धा |
| ३. एशियन गेम्स | ८. युथ ऑलम्पिक | १३. पॅरा एशियन स्पर्धा |
| ४. राष्ट्रकुल स्पर्धा | ९. ज्यु. विश्व अजिंक्यपद स्पर्धा | १४. ज्यु. एशियन चॅम्पियनशिप |
| ५. एशियन कप | १०. वर्ल्ड कपवर्ल्ड / युनिर्व्हसिटी | १५. राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) |
| १६. ऑलिम्पिक क्रीडा प्रकारातील राष्ट्रीय वरिष्ठ व कनिष्ठ स्पर्धा | | |

** उडाण खेल प्रोत्साहन योजना **

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | द्यावयाचे आर्थिक सहाय्य (पदक प्राप्त खेळाडू) | सहभाग |
|---|---|---|---|
| 1 | आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पदक विजेता (राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, वर्ल्ड कप दर दोन वर्षांनी आयोजित आशियाई क्रीडा स्पर्धा / एशियन चॅम्पियनशिप) | रु .2,00,000/- | …… |
| 2 | सहभागी खेळाडू (ऑलम्पिक क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा) | रु .1,00,000/- | …… |
| 3 | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, पदक प्राप्त खेळाडू | रु .1,00,000/- | रु .21,000 |
| 4 | वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा व कनिष्ठ गट राष्ट्रीय स्पर्धा केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण विभागाद्वारे मान्यता प्राप्त क्रीडा प्रकार (ऑलम्पिक क्रीडा प्रकार/आशियाई क्रीडा प्रकार/ राष्ट्रकुल क्रीडा प्रकार) पदक विजेता. | रु .50,000/- | …… |

निवड समिती :-

वर नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेचे ठिकाण इ. बाबी विचारात घेऊन पात्र खेळाडूंना अनुदान देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत शिफारस करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. अति. आयुक्त | अध्यक्ष |
| २. | उपायुक्त (समाज विकास विभाग / क्रीडा विभाग / महिला व बालकल्याण) | सदस्य |
| ३. | ऑलम्पिक खेळाडू /छत्रपती अवार्डी/ आंतराष्ट्रीय खेळाडू<br>(मा. आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेले सदस्य) | सदस्य |
| ४. | क्रीडा अधिकारी महानगरपालिका | सदस्य सचिव |

निवड समितीचे कार्य :-

विभागाकडे सादर अर्जाची अटी व शर्तीनुसार छानणी करुन यादी अंतिम करणे व मंजूरीसाठी मा.आयुक्त यांना सादर करणे.

| | |
|---|---|
| अर्थसंकल्पीय व्यय पद क्र. :- | A२६५०२२४१००३<br>नागपूर शहरातील उदन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देणे. |
| पद शिर्षक विवरण :- | नागपूर शहरातील उदन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देणे व तसेच महिला खेळाडूंसाठी महिला व बालकल्याण विभागाच्या लेखा शिर्षकातुन A४७००२४७३८०३ निधी देता येईल. |

अटी व शर्ती :-

१. कुटुंबाचे नागपूर महानगरपालिका क्षेत्रात किमान ५ वर्षे वास्तव्य असल्याबाबतचा पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्याचा चालु वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती/निवडणूक ओळखपत्र/मतदार यादीतील नांव/पाणीपट्टी विजबिल/तीन वर्षाचा भाडे करारनामा/रेशनकार्ड/विवाह नोंदणी दाखला पुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)

२. आधारकार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, सादर करणे बंधनकारक राहील.

३. अर्जासोबत खेळाडू असल्याबाबतचे सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.

४. आर्थिक वर्ष ,२२-२०२१) मध्ये खेळाडूंना आर्थिक लाभ मिळण्यास मागील तीन वर्षाचा २५-२०२४ या (२४-२०२३ ,२३-२०२२Performance ग्राहय धरुन Evaluation करण्यात येईल.

५. भारतीय शालेय खेल महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्या वतीने अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धासाठी निवड झाल्याबाबत प्रमाणपत्र संबंधित खेळाडूकडे असावे. निमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धासाठी झालेली निवड पात्र ठरणार नाही. राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती यासाठी संबंधित खेळ संघटनेचे प्रमाणपत्र यांचे झेरॉक्स प्रत सत्यप्रत करुन सादर करणे आवश्यक आहे.

६. सदर योजने अंतर्गत प्राप्त अनुदानाच्या रकमेचा क्रीडा प्राविण्यासाठीच्या बाबींवर खर्च करण्यात येईल याचे बंधपत्र दयावे लागेल.

७. सदर योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वळते करण्यात येईल.

८. अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.

९. सदर योजनेचा लाभ प्रत्येक खेळाडूना केवळ एकदाच देण्यात येईल.

१०. अर्जासोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेले असावेत.

११. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजुर करणे अथवा नाकारणे तसेच अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

१२. क्रीडा मंडळे, संस्था, निमशासकीय संस्था यांनी आयोजित केलेल्या स्पर्धामधील प्रमाणपत्रे योजनेचा लाभ देण्यास ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

१३. सदर योजनेचा लाभ मिळणेकामी दिलेल्या मुदतीत विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१४. अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास सदर योजना लाभ देण्यात येणार नाही.

१५. सदर योजनेचा लाभ मिळणेबाबत विद्यार्थी खेळाडूंस हक्क सांगता येणार नाही.

१६. सदर योजनेचा लाभासाठी अर्ज Online म.न.पा. च्या सांकेतीक स्थळावर किंवा क्रीडा व सांस्कृतीक विभागात उपलब्ध करुन देण्यात येईल.

१७. विविध खेळात प्राविण्य मिळविले तरी, क्रीडा शिष्यवृत्ती एकदाच देय राहील.

१८. योजनेचे धोरण, नियम व अटींमध्ये बदल करण्याचा अथवा वाढ किंवा घट करण्याचा अथवा शिथिल करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील.

१९. अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास आर्थिक सहाय्य दिले जाणार नाही. फसवणूक करुन आर्थिक सहाय्य घेतल्यास ती कायदेशिर कारवाई करुन वसूल केली जाईल.

२०. आंतरराष्ट्रीय जागतिक मानांकन क्रीडा स्पर्धेत प्रविण्य मिळविलेल्या खेळाडूंनी संबंधित क्रीडा संघटनेमार्फत अर्ज केल्यास, अशा खेळाडूंनाही वरील प्रमाणे आर्थिक सहाय्य देय राहील. (उदा. बॅडमिंटन, लॉन टेनिस, बुद्धिबळ इ.)

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 84/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 30/08/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार नियंत्रण अधिकारी (क्रीडा), क्रीडा व सांस्कृतिक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडूंना" उडाण खेल प्रोत्साहन योजना "
योजनेचा उद्देश :-

नागपूर महानगरपालिकेचा व आजूबाजूच्या परिसराचा झपाट्याने विकास होत असुन क्रीडा क्षेत्राचा विकास देखील तेवढ्याच झपाट्याने होणे गरजेचे आहे. नागपूर महानगरपालिका क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य राहावी. नागरीकांमध्ये व्यायामाची आवड जोपासावी. खेळाडूंची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करावी यासाठी या खेळाडूंना दर्जेदार सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिले आहे. काही खेळाडूंची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे किंवा विविध कारणामुळे खेळाडू बांधव क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट असले

तरी त्यांना प्रशिक्षण घेणे, साहित्य खरेदी करणे, प्रशिक्षकांमार्फत मार्गदर्शन प्राप्त करणे, प्रवास करणे इत्यादी कार्याकरिता तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धामध्ये भाग घेण्यास अडचणी निर्माण होतात. खेळाडू बांधवांनी स्वतःचे, नागपूर शहराचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व संघटनेमार्फत खेळणा-या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून म.न.पा. क्षेत्रातील जास्तीत जास्त राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने रोख आर्थिक सहाय्य देण्याचा मानस आहे.

लाभ देण्यात येणाऱ्या स्पर्धा :-

| | | |
|---|---|---|
| १. ऑलम्पिक गेम्स | ६. राष्ट्रकुल युवा स्पर्धा | ११. शालेय आशियाई/जागतिक स्पर्धा |
| २. विश्व अजिंक्यपद स्पर्धा | ७. एशियन चॅम्पियनशिप | १२. पॅरा ऑलम्पिक स्पर्धा |
| ३. एशियन गेम्स | ८. युथ ऑलम्पिक | १३. पॅरा एशियन स्पर्धा |
| ४. राष्ट्रकुल स्पर्धा | ९. ज्यु. विश्व अजिंक्यपद स्पर्धा | १४. ज्यु. एशियन चॅम्पियनशिप |
| ५. एशियन कप | १०. वर्ल्ड कपवर्ल्ड / युनिर्व्हसिटी | १५. राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) |
| १६. ऑलिम्पिक क्रीडा प्रकारातील राष्ट्रीय वरिष्ठ व कनिष्ठ स्पर्धा | | |

** उडाण खेल प्रोत्साहन योजना **

| अ.क्र. | स्पर्धा प्रकार | द्यावयाचे आर्थिक सहाय्य (पदक प्राप्त खेळाडू) | सहभाग |
|---|---|---|---|
| 1 | आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा पदक विजेता (राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, वर्ल्ड कप दर दोन वर्षांनी आयोजित आशियाई क्रीडा स्पर्धा / एशियन चॅम्पियनशिप) | रु .2,00,000/- | …… |
| 2 | सहभागी खेळाडू (ऑलम्पिक क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा, राष्ट्रकुल स्पर्धा) | रु .1,00,000/- | …… |
| 3 | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, पदक प्राप्त खेळाडू | रु .1,00,000/- | रु .21,000 |
| 4 | वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा व कनिष्ठ गट राष्ट्रीय स्पर्धा केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण विभागाद्वारे मान्यता प्राप्त क्रीडा प्रकार (ऑलम्पिक क्रीडा प्रकार/आशियाई क्रीडा प्रकार/ राष्ट्रकुल क्रीडा प्रकार) पदक विजेता. | रु .50,000/- | …… |

निवड समिती :-

वर नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करणाऱ्या खेळाडूंना स्पर्धेचे ठिकाण इ. बाबी विचारात घेऊन पात्र खेळाडूंना अनुदान देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत शिफारस करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. अति. आयुक्त | अध्यक्ष |
| २. | उपायुक्त (समाज विकास विभाग / क्रीडा विभाग / महिला व बालकल्याण) | सदस्य |
| ३. | ऑलम्पिक खेळाडू /छत्रपती अवार्डी/ आंतराष्ट्रीय खेळाडू (मा. आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेले सदस्य) | सदस्य |
| ४. | क्रीडा अधिकारी महानगरपालिका | सदस्य सचिव |

निवड समितीचे कार्य :-

विभागाकडे सादर अर्जाची अटी व शर्तीनुसार छानणी करुन यादी अंतिम करणे व मंजूरीसाठी मा.आयुक्त यांना सादर करणे.

अर्थसंकल्पीय व्यय पद क्र. :- A२६५०२२४१००३

नागपूर शहरातील उदन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देणे.

पद शिर्षक विवरण :- नागपूर शहरातील उदन्मुख खेळाडूंना प्रोत्साहन देणे व तसेच महिला खेळाडूंसाठी महिला व बालकल्याण विभागाच्या लेखा शिर्षकातुन A४७००२४७३८०३ निधी देता येईल.

अटी व शर्ती :-

१. कुटुंबाचे नागपूर महानगरपालिका क्षेत्रात किमान ५ वर्षे वास्तव्य असल्याबाबतचा पुरावा म्हणून मालमत्ताधारक असल्याचा चालु वर्षाचा मालमत्ता कर भरल्याबाबतची पावती/निवडणूक ओळखपत्र/मतदार यादीतील नांव/पाणीपट्टी विजबिल/तीन वर्षाचा भाडे करारनामा/रेशनकार्ड/विवाह नोंदणी दाखला पुरावा म्हणून सादर करावा लागेल. (उपरोक्त पैकी कोणतेही दोन पुरावे सादर करणे अनिवार्य राहील.)

२. आधारकार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, सादर करणे बंधनकारक राहील.

३. अर्जासोबत खेळाडू असल्याबाबतचे सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.

४. आर्थिक वर्ष ,२२-२०२१) मध्ये खेळाडूंना आर्थिक लाभ मिळण्यास मागील तीन वर्षाचा २५-२०२४ या (२४-२०२३ ,२३-२०२२Performance ग्राहय धरुन Evaluation करण्यात येईल.

५. भारतीय शालेय खेल महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्या वतीने अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धासाठी निवड झाल्याबाबत प्रमाणपत्र संबंधित खेळाडूकडे असावे. निमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धासाठी झालेली निवड पात्र ठरणार नाही. राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय खुल्या वरिष्ठ गटातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य अथवा क्रीडा शिष्यवृत्ती यासाठी संबंधित खेळ संघटनेचे प्रमाणपत्र यांचे झेरॉक्स प्रत सत्यप्रत करुन सादर करणे आवश्यक आहे.

६. सदर योजने अंतर्गत प्राप्त अनुदानाच्या रकमेचा क्रीडा प्राविण्यासाठीच्या बाबींवर खर्च करण्यात येईल याचे बंधपत्र दयावे लागेल.

७. सदर योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वळते करण्यात येईल.

८. अर्जासोबत अर्जदाराचा अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज फोटो लावणे आवश्यक राहील.

९. सदर योजनेचा लाभ प्रत्येक खेळाडूना केवळ एकदाच देण्यात येईल.

१०. अर्जासोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेले असावेत.

११. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर योजनेचा लाभ मंजुर करणे अथवा नाकारणे तसेच अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

१२. क्रीडा मंडळे, संस्था, निमशासकीय संस्था यांनी आयोजित केलेल्या स्पर्धामधील प्रमाणपत्रे योजनेचा लाभ देण्यास ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

१३. सदर योजनेचा लाभ मिळणेकामी दिलेल्या मुदतीत विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१४. अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास सदर योजना लाभ देण्यात येणार नाही.

१५. सदर योजनेचा लाभ मिळणेबाबत विद्यार्थी खेळाडूंस हक्क सांगता येणार नाही.

१६. सदर योजनेचा लाभासाठी अर्ज Online म.न.पा. च्या सांकेतीक स्थळावर किंवा क्रीडा व सांस्कृतीक विभागात उपलब्ध करुन देण्यात येईल.

१७. विविध खेळात प्राविण्य मिळविले तरी, क्रीडा शिष्यवृत्ती एकदाच देय राहील.

१८. योजनेचे धोरण, नियम व अटींमध्ये बदल करण्याचा अथवा वाढ किंवा घट करण्याचा अथवा शिथिल करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील.

१९. अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास आर्थिक सहाय्य दिले जाणार नाही. फसवणूक करुन आर्थिक सहाय्य घेतल्यास ती कायदेशिर कारवाई करुन वसूल केली जाईल.

२०. आंतरराष्ट्रीय जागतिक मानांकन क्रीडा स्पर्धेत प्रविण्य मिळविलेल्या खेळाडूंनी संबंधित क्रीडा संघटनेमार्फत अर्ज केल्यास, अशा खेळाडूंनाही वरील प्रमाणे आर्थिक सहाय्य देय राहील. (उदा. बॅडमिंटन, लॉन टेनिस, बुद्धिबळ इ.)

उपरोक्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**